फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९७/२०१४ मधील नि.११५ वरील आदेश
(मानिनी वि. जितेंद्र वगैरे)

अर्जदार हिने मूळ अर्ज जाबदारांविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १८ ते २२ अन्वये दाखल केला असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांचे जिवीतास जाबदार क्र.१, ३ व अनोळखी महिलेपासून धोका असलेने त्यांचे विरुध्द संरक्षण मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार हिचे असे कथन आहे की, ती विटा येथील सहयाद्री नावाच्या इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर रहात आहे. अर्जदार क्र.२ सार्थक हा तिचा मुलगा असून तो सातारा येथे शिक्षणास आहे. त्यामुळे, अर्जदार ही तिच्या मुलाचे देखभालीकरिता जावून येवून असते. सार्थक हा इयत्ता १२ वी उत्तीर्ण झाला असून पुढील शिक्षणाकरिता त्याला बालाजीनगर, सांगली येथे ठेवले असून तेथे देखील अर्जदार हिचे जाणे येणे असते. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ही दिनांक २४.१०.२०२० रोजी दुपारी १.०० वाजता सार्थकचे ई.डब्ल्यु. चे प्रमाणपत्र काढणेकरिता विटा येथे आली होती. तेंव्हा अर्जदार क्र.१ ही सहयाद्री इमारतीमधील तिचे घरी गेली असता जाबदार क्र.१ जितेंद्र व जाबदार क्र.३ कमल व त्यांचे सोबत रहात असलेली एक अनोळखी महिला यांनी अर्जदार क्र.१ हिस धक्काबुक्की करुन मारहाण केली. जाबदार क्र.१ यांनी चाकुने अर्जदार क्र.१ वर वार करीत असताना अर्जदार क्र.१ हिच्या उजव्या हाताला जखम झाली. जाबदार क्र.३ हिने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

**०३.** सदर घटनेबाबत अर्जदार क्र.१ हिने विटा पोलीस ठाणेत तक्रार दाखल केलेने जाबदार क्र.१, ३ व अनोळखी महिले विरुध्द भा.द.वि.कलम ३२३,३२४,५०४ सह ३४ अन्वये गुन्हा दाखल करणेत आला. गुन्हा दाखल केल्यामुळे, जाबदार हे जास्तच चिडले असून ते अर्जदार यांना जिवंत मारतील

अशी अर्जदार यांना भिती आहे. विटा येथील सहयाद्री इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर रहात असताना जाबदार क्र.१, ३ व एका अनोळखी महिलेपासून अर्जदार यांच्या जिवीतास धोका असून त्यांचेशी घातपात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, अर्जदार यांना संरक्षणाची आवश्यकता असलेने अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुत अर्जास जाबदार यांनी नि.११६ चे पाठीमागे त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल करुन अर्जदार हिची कथने अमान्य केलेली आहेत. जाबदार यांच्या कथनानुसार अर्जदार हिची मागणी संदिग्ध असून तिस कशाप्रकारचे संरक्षण हवे आहे याचा बोध होत नाही. अर्जदार मागणी करते अशाप्रकारचे संरक्षण ती पोलीस ठाणेमार्फत घेवू शकते. जाबदार हे भा.द.वि. कलम ४९८-अ मधील अपराधातून निर्दोष मुक्त झालेचा राग मनात धरुन अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. जाबदार यांनी अर्जदार हिस तिचा हिस्सा दिला असून अर्जदार ही सध्या सातारा येथे रहात आहे. असे असून देखील केवळ खोटा पुरावा निर्माण करण्याच्या उद्देशाने व प्रकरण प्रलंबित ठेवणेकामी अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असलेने तो फेटाळणेची विनंती केली आहे.

**०५.** अर्जदार व जाबदार यांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन पुढील विचाराधीन बाबी उपस्थित होतात. त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हीने मागणी केल्याप्रमाणे जाबदारांपासून संरक्षण आदेश मिळण्यास ती पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**विचाराधीन बाब क्र.१ बाबतः–**

**०६.** कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येमध्ये अनेक कृत्ये, अकृत्ये व आचरणांचा समावेश होतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार हिने कथन केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या संबंधित कलमांचा उल्लेख या ठिकाणी करणे जरुरीचे वाटते **कलम ३. कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या–** या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, उत्तरवादीचे कोणतेही कृत्य, अकृत्य किंवा आचरण ही, जर त्यामुळे–**(क)** पिडीत व्यक्तीचे आरोग्य, सुरक्षितता, अवयव किंवा मानसिक वा शारिरीक स्वास्थ्य यांना हानी किंवा क्षती किंवा धोका पोहोचत असेल किंवा तसे करण्याकडे त्याचा कल असेल आणि त्यामध्ये शारिरीक दुर्व्यवहार, लैंगिक दुर्व्यवहार, शाब्दीक व भावनिक दुर्व्यवहार आणि आर्थिक दुर्व्यवहार घडवून आणण्याचा समावेश होत असेल; किंवा **(ग)** पिडीत व्यक्ती कौटुंबिक नाते संबंधामुळे ज्यांचा वापर करण्यास किंवा लाभ घेण्यास हक्कदार आहे अशी साधनसंपत्ती किंवा सुविधा, तसेच सामाईक घरातील प्रवेशाचा हक्क, कायम उपलब्ध असण्यास मनाई करणे किंवा निर्बंध घालणे यांचा समावेश होतो.

**०७.** प्रस्तुत अर्जाचा विचार करताना त्यामुळे सर्वप्रथम याचा उल्लेख करणे आवश्यक वाटते की, अर्जदार क्र.१ हिचेवर कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे का व संरक्षण आदेश मिळविणेस ती पात्र ठरते का हे प्रथमदर्शनी पाहणे गरजेचे आहे. अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे अर्जदार क्र.२ याचे ई.डब्ल्यु. चे प्रमाणपत्र काढणेकरिता अर्जदार क्र.१ ही विटा येथे आली होती. तेंव्हा ती सहयाद्री इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर गेली. अर्जदार हिच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदार हिचे असे कथन दिसून येते की, अर्जदार क्र.१ ही सन २००७ मध्ये विटा येथील सहयाद्री इमातीमध्ये पहिल्या मजल्यावरील ३०० चौ.फूट.

क्षेत्राच्या दोन खोल्यामध्ये राहू लागली. जाबदार यांचे कथनानुसार अर्जदार सातारा येथे रहात असून तिने नमूद केलेली घटना ही खोटा पुरावा गोळा करण्याच्या उद्देशाने केली आहे. याउलट, अर्जदार हिचे असे कथन आहे की, ती ज्यावेळेस सहयाद्री इमारतीमध्ये तिचे घराजवळ गेली त्यावेळी जाबदार क्र.१, ३ व अनोळखी महिला यांनी तिला "हे माझे घर आहे, तु इथे का आली आहेस" असे म्हणून धक्काबुक्की करुन मारहाण केली.

**०८.** वरील कथनांच्या अनुषंगाने कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाचे कलम २(क) "**पिडीत व्यक्ती**" याचा अर्थ जिचा उत्तरवादीबरोबर कौटुंबिक नातेसंबंध असेल किंवा राहिला असेल अशी आणि उत्तरवादीकडून जिच्या बाबतीत कोणतीही कौटुंबिक हिंसाचाराची कृती करण्यात आली आहे असा आरोप करणारी महिला असा आहे. तसेच २(ध) अन्वये "**सामाईक घर**" यांचा अर्थ, जेथे पिडीत व्यक्ती, कौटुंबिक नातेसंबंधात एकटीच किंवा उत्तरवादीबरोबर रहात असेल किंवा कोणत्याही टप्प्यात राहिली असेल असे घर, असा आहे. त्या सामाईक घरामध्ये उत्तरवादीचा किंवा पिडीत व्यक्तीचा कोणताही हक्क, मालकी हक्क, किंवा हितसंबंध असो अगर नसो, समावेश असेल.

**०९.** वरील कायदेशीर तरतुदींच्या अनुषंगाने नि.७३ कडील उलटतपासाचे अवलोकन केले असता, सहयाद्री इमारतीमध्ये अर्जदार क्र.१ रहात असलेल्या दोन खोल्यांना तिचे नावचे स्वतंत्र मिटर व कनेक्शन होते असा सूचक प्रश्न जाबदार यांच्या विधिज्ञांनी विचारलेला दिसून येतो. तसेच अर्जदारतर्फे सा.क्र.२ चंद्रशेखर जयशिंगराव यादव यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.८७ कडे दाखल केले असून त्यांच्या उलटतपासामध्ये देखील जाबदार क्र.१ यांचे विधीज्ञांनी, सन २००७ पासून अर्जदार ही सहयाद्री इमारतीमध्ये स्वतंत्र खोलीत रहात असल्यबाबतचा सूचक प्रश्न विचारल्याचे दिसून येते. यावरुन अर्जदार ही पूर्वी 'सामाईक घर' सहयाद्री इमारतीमध्ये रहात होती व त्यामुळे, तिचे तेथे

संसारोपयोगी घरगुती साहित्य असण्याची बाब प्रथमदर्शनी नाकारता येत नाही. जाबदारने युक्तिवादादरम्यान बालाजीनगर येथे अर्जदार राहते म्हणजे अर्जदार उच्चभ्रु व सधन असल्याचे कथन केले आहे. यावरुन अर्जदार सार्थकच्या शिक्षणाकरिता बालाजीनगर, सांगली येथे असते ही बाब जाबदार यांना पूर्णपणे अमान्य आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे, अर्जदार क्र.२ यास पुढील शिक्षणाकरिता बालाजीनगर, सांगली येथे ठेवले आहे व त्याचे इ.डब्ल्यू. चे प्रमाणपत्र मिळविणेकरिता अर्जदार क्र.१ ही विटा येथे सहयाद्री इमारतीमध्ये आली होती हया बाबी प्रथमदर्शनी विश्वसनिय वाटतात.

**१०.** अर्जदार हीने तिस झालेल्या मारहाणी संदर्भात असे कथन केले आहे की, ती दिनांक २४.१०.२०२० रोजी दुपारी १.०० वाजता अर्जदार क्र.२ चे ई.डब्ल्यू. चे प्रमाणपत्र काढणेकरिता विटा येथे आली होती. तेंव्हा अर्जदार क्र.१ ही सहयाद्री इमारतीमध्ये गेली असता जाबदार क्र.१ जितेंद्र, जाबदार क्र.३ कमल व त्यांचे सोबत रहात असलेली एक अनोळखी महिला यांनी "हे माझे घर आहे, तु इथे का आली आहेस" असे म्हणून अर्जदार क्र.१ हिस धक्काबुक्की करुन मारहाण केली. जाबदार क्र.१ यांनी चाकुने अर्जदार क्र.१ वर वार करीत असताना अर्जदार क्र.१ हिच्या उजव्या हाताला जखम झाली. जाबदार क्र.३ हिने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यामुळे, अर्जदार हिने जाबदार क्र.१, ३ व अनोळखी महिले विरुध्द विटा पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली.

**११.** सदर कथनांचे पृष्ठयर्थ अर्जदार क्र.१ हिने नि.११७/१ कडे तिला झालेल्या मारहाणी संदर्भातील छायाचित्रे दाखल केलेली आहेत. नि.११७/२ कडे जाबदार क्र.१, ३ व अनोळखी महिले विरुध्द विटा पोलीस ठाणे येथे दाखल केलेल्या प्रथम खबर अहवालाची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. तसेच दिनांक २०.११.२०२० रोजी ११.३३ वा. कोर्ट आवारात अर्जदार क्र.१ हिस जाबदार क्र.१ यांनी केलेल्या मारहाणी संदर्भात त्यांचे विरुध्द दाखल केलेल्या एन.सी.आर. ची छायांकित प्रत नि.११९/१ कडे दाखल केलेली आहे.

नि.११७/१ कडील छायाचित्रांचे अवलोकन केले असता अर्जदार हिच्या शरिरावर जखमा झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच नि.११७/२ कडील प्रथम खबर अहवाल व नि.११९/१ कडील एन.सी.आर. च्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता अर्जदार क्र.१ हिस झालेल्या मारहाणी संदर्भात तिने त्वरीत जाबदार यांचे विरुध्द भा.द.वि. कलम ३२३, ३२४, ५०४ सह कलम ३४ अन्वये फिर्याद दिल्याचे दिसून येते. सदर कथनांचे पृष्ठयर्थ अर्जदार क्र.१ हिने नि.११६ कडे तिचे शपथपत्र दाखल केलेले आहे. याउलट, जाबदारांकडून अर्जदार हिची कथने व कागदोपत्री पुरावा नाकारण्याव्यतिरिक्त कोणत्याही बाबी अभिलेखावर आलेल्या नाहीत. अर्जदार शपथेवर कथन करीत असलेली घटना पूर्णपणे खोटी आहे व तिच्या जखमा या अन्य कारणामुळे झाल्या आहेत असा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा जाबदार यांनी सादर केलेला नाही. त्यामुळे, अर्जदार हिची कथने व त्याचे पृष्ठयर्थ सादर केलेला प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा पाहता अर्जदार क्र.१ हिस जाबदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचार झालेबाबतची बाब उपलब्ध कागदपत्रांवरुन अर्जदार क्र.१ हिने प्रथमदर्शनी सिध्द केलेली आहे.

**१२.** जाबदारतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी युक्तिवादादरम्यान माझे लक्ष कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १८–संरक्षण आदेशकडे वेधलेले आहे. सदर कलमान्वये दंडाधिकाऱ्याला, पिडीत व्यक्ती आणि उत्तरवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यावर आणि कौटुंबिक हिंसाचार घडला आहे किंवा घडण्याचा संभव आहे याबाबत सकृतदर्शनी खात्री पटल्यावर, पिडीत व्यक्तीच्या बाजूने संरक्षण आदेश काढता येईल आणि उत्तरवादी विरुध्द मनाई करता येईल. परंतु, अर्जदार हिने तिला झालेल्या मारहाणीबाबत कोणताही पुरावा सादर केला नसलेने ती संरक्षण आदेश मिळविण्यास पात्र ठरत नाही असा युक्तिवाद जाबदार यांचे विद्वान विधिज्ञांनी केलेला आहे.

**१३.** जाबदार यांचेतर्फे सादर करण्यात आलेल्या युक्तिवादास अनुसरुन कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३–

**अंतरिम व एकतर्फी आदेश देण्याचा अधिकार** हे विचारात घेता, दंडाधिकारी, या अधिनियमाखालील, त्याच्यापुढील कोणत्याही कार्यवाहीमध्ये त्याला न्याय्य व योग्य वाटेल असा अंतरिम आदेश देवू शकेल. तसेच उत्तरवादी कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य करीत आहे किंवा त्याने ते केले आहे किंवा उत्तरवादीकडून कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य घडणे संभाव्य आहे असे अर्जावरुन सकृतदर्शनी स्पष्ट होत असल्याबाबत दंडाधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर, त्याला, कलम १८, १९, २०, २१ किंवा यथास्थिती, कलम २२ अन्वये उत्तरवादी विरुध्द एकतर्फी आदेश देता येईल.

**१४.** वरील सर्व कायदेशिर तरतुदींचे व अर्जदार हिने शपथेवर केलेली कथने व त्याचे पृष्ठयर्थ दाखल केलेला कागदोपत्री पुरावा पाहता अर्जदार क्र.१ हिचेवर कौटुंबिक हिंसाचार घडला आहे तसेच घडण्याचा संभव आहे याबाबत अर्जदार क्र.१ हिने सकृतदर्शनी खात्री पटवून दिलेली आहे. जाबदार यांना संधी देवून देखील त्यांनी अर्जदार हिची कथने व कागदोपत्री पुराव्यावर अविश्वास ठेवण्यासारखा प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे, अर्जदार हिस कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १८ सह कलम २३ अन्वये संरक्षण देणे न्यायाचे ठरते. सबब, विचाराधीन बाब क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार हिचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. जाबदार क्र.१ जितेंद्र उत्तम जाधव, क्र.३ कमल उत्तम जाधव व त्यांचेतर्फे कोणीही इसम यांनी अर्जदार क्र.१ मानिनी जितेंद्र जाधव हिचा मूळ प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करु नये असे प्रस्तुत आदेशाद्वारे त्यांना प्रतिबंधीत करणेत येत आहे.

३. सदर आदेशाची एक प्रत पोलीस ठाणे, विटा व संरक्षण अधिकारी यांना देणेत यावी.

४. सदर आदेशाची एक प्रत दोन्ही पक्षकारांना विनामूल्य देणेत यावी.

५. उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Deepali Shivaji Chothe
Digitally signed by Deepali Shivaji Chothe
Date: 2020.12.08 16:43:02 +0530

दिनांकः–०५.१२.२०२० (दीपाली शि. चोथे)

विटा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, विटा .

जि. सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | R. B. Samalewale |
| Name of the Court | :- | Smt. Deepali S. Chothe<br>Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 05.12.2020 |
| Order signed by P.O. on | :- | 08.12.2020 |
| Order uploaded on | :- | 08.12.2020 |